दै. गोदातीर समाचार. 17/01/2023.

दै. गोदातीर दि. 17/01/2023

# गायीची अवैध वाहतूक करणारी स्कॉर्पीओ जप्त, गायीची सुटका

**नांदेड–** स्थानिक गुन्हे शाखेचे एक पथक सोमवारी दि. १६ रोजी पहाटे शहरात गस्त घालत होते. संशयास्पद असलेल्या एका स्कार्पिओ जीपचा पाठलाग करण्यात आला. त्यात अवैध वाहतूक करणाऱ्या गार्यींची सुटका करून स्कार्पिओ गाडी जप्त करण्यात आली. मात्र गाडीतील तिन्ही आरोपी पसार होण्यात यशस्वी झाले.

सोमवार दि. १६ जानेवारी रोजी पहाटे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांना गुप्त बातमीदाराकडून खात्रीशीर माहिती मिळाली की, काही व्यक्ती मुदखेड रस्त्याने नांदेडकडे एका स्कॉर्पीओ जिपमध्ये गायीस वेदना होतील अशा स्थितीमध्ये दोरीने बांधुन निर्दयीपणे घेवून जात आहेत. अशी माहिती मिळताच पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांनी स्थागुशाचे पोउपनि सचिन सोनवणे व अंमलदार यांना रवाना केले. पथकाने माळटेकडी ब्रिजजवळ येथे जावून सापळा रचला. स्कॉर्पीओ जीप क्रमांक (एमएच२६- एल- २९११) ही भरधाव वेगात आली. पोलिसांनी गाडीला थांबवले असता गाडीमधील तीनही व्यक्ती पोलिसांना पाहून गाडी सोडून पळून गेले. पोलिसांनी पंचासमक्ष स्कॉर्पीओची पाहणी केली असता स्कॉर्पीओ क्रं. (एम एच २६ एल २९११) या जीपमध्ये पाय तोंड दोरीने आवळून बांधून कोंबलेली एक लाल रंगाची गाय मिळून आली. या गायीचे बाजार मूल्य ४० हजार रुपये आहे. गाय व स्कॉर्पीओ जीप असे तीन लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करुन विमानतळ पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले.

पसार तिन्ही व्यक्तीविरुध्द विमानतळ ठाण्यात कलम २७९, ३४ भा द विसह कलम ९ महाराष्ट्र प्राणी रक्षण (सुधारणा) अधिनियम १९९५ व कलम ११(१)(घ)(च) प्राण्यांना क्रुरतेने वागवण्यास प्रतिबंध अधिनियम १९६० व ११९ महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ प्रमाणे पोउपनि सचिन सोनवणे यांचे फिर्यादवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.